**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education**
**S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**स.न.८३२–ए, फा.प्लॉ.नं. १७८,१७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।**
**Email : secretary.stateboard@gmail.com**

जा.क्र.रा.मं./परीक्षा–६/६९७२ दिनांक ३०/१२/२०२२

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–४०००३२.
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई–४०००३०.
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई–२०
५) मा. संचालक,आकाशवाणी केंद्र पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक/रत्नागिरी
६) मा. सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्रे

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२३ परीक्षांच्या अंतिम वेळापत्रकांबाबत

महोदय,

फेब्रु–मार्च २०२३ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांच्या वेळापत्रकाबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपली विश्वासू,

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ०४.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी–

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/रत्नागिरी यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे. व सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे
३) अस्वीस, राज्यमंडळ, पुणे
४) ऑनलाईन विभाग

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२३ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

# प्र क ट न

---

फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांची संभाव्य वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि. १९/०९/२०२२ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली असून, सदर वेळापत्रकांबाबत सूचना असल्यास मंडळाकडे १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार संघटना, पालक, शिक्षक यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनांचे अवलोकन करून इ.१२वी व इ.१०वी ची वेळापत्रके अंतिम करण्यात आलेली आहेत. अंतिम वेळापत्रकानुसार लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व व्दिलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | मंगळवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२३ ते मंगळवार दि. २१ मार्च २०२३ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा | गुरूवार, दि. ०२ मार्च २०२३ ते शनिवार, दि. २५ मार्च २०२३ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर दि. ३०.१२.२०२२ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ठ व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअ‍ॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांच्या परीक्षांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक :- ३०.१२.२०२२

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

Desktop/2023 time table